# सारथी




शिक्षण विभाग
पंचायत समिती, कल्याण

## प्रेरणास्थान

**मा. श्री. मनुज जिंदल (IAS)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, ठाणे

**मा. डॉ. भाऊसाहेब कारेकर**
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, ठाणे

**मा. श्रीम. ललिता दहितुले**
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, ठाणे

## निर्मिती व प्रकाशन

**शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण.**
**जिल्हा परिषद ठाणे**

## संपादक व प्रकाशक

**डॉ. रुपाली खोमणे**
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती कल्याण.

## प्रोत्साहन

**श्रीम. विद्या नाईकवाडी**
विस्तार अधिकारी तथा गटसमन्वयक
पंचायत समिती कल्याण

**श्री. अनिल कुऱ्हाडे**
जिल्हा IE समन्वयक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद ठाणे

## कार्यकारी संपादक

**श्रीम. वैशाली शिंदे**
विशेष तज्ञ, समावेशित शिक्षण विभाग
पंचायत समिती कल्याण

**श्री. किरण लोखंडे**
विशेष तज्ञ, समावेशित शिक्षण विभाग
पंचायत समिती कल्याण

## निर्मिती सहाय्यक

**सौ.प्रज्ञा साखरे    श्री. धिरज ननावरे    सौ. सिमा देशमाने    श्री. रवि सोनावणे    श्री. किरण हजारे**

विशेष शिक्षक समावेशित शिक्षण विभाग
पंचायत समिती कल्याण



# सारथी

शिक्षण विभाग
पंचायत समिती, कल्याण

# शुभेच्छा पुष्प

**मा.श्री.मनुज जिंदल (IAS)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,ठाणे.

पंचायत समिती कल्याण, शिक्षण विभागाद्वारे दिव्यांग विद्यार्थ्यांची यशोगाथा अधोरेखित करणारे 'सारथी' ह्या आकर्षक, प्रेरणादायी पुस्तिकेचे प्रकाशन होत आहे ही अत्यानंदाची बाब आहे. मुखपृष्ठावरील होकायंत्र दिशादर्शक वाटते. सदर मुखपृष्ठ आतील आशयाशी एकरूप होते. समावेशित शिक्षणात समाविष्ट असलेला प्रत्येक घटक, योजना, त्या अनुषंगाने राबविण्यात आलेले उपक्रम आणि त्याची फलश्रृती असा खूप सारा अवकाश एका छोट्या पुस्तकात सामावला आहे. दिव्यांगजणांना सहानुभूतीची नाही, तर समानतेतून संधी देण्याची आवश्यकता आहे याची जाणीव समाजमनाला करून देण्याचे काम 'सारथी' नक्कीच करेल.सदर पुस्तिका निर्माण केल्याबद्दल पंचायत समिती कल्याण शिक्षण विभाग यांचे खूप अभिनंदन !

**मा.डॉ.भाऊसाहेब कारेकर**
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, ठाणे.

पंचायत समिती कल्याण अंतर्गत सारथी ही पुस्तिका प्रकाशित होत असल्याचा शिक्षणाधिकारी या नात्याने मला अभिमान वाटतो.

सदर पुस्तिकेत दिव्यांगासाठी गरजेनुरूप व आवश्यकतेनुसार शैक्षणिक सामाजिक व आरोग्य विषयक आर्थिक विकासाच्या बहुविध कल्याणकारी योजनांची व शासन निर्णयाची माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. सारथी पुस्तिका शिक्षक, पालक व कार्यकारी यंत्रणेसाठी उपयुक्त ठरणार आहे. या पुस्तिकेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना येणारी आव्हाने त्यावरील उपाय योजना वैद्यकीय, आर्थिक अनुदान, समग्र शिक्षा मार्फत घेण्यात येणारी शिबिरे व साहित्य उपलब्धता या सर्वांची माहिती संग्रहित करण्यात आली आहे. या पुस्तिकेचा सर्व दिव्यांग मुलांना लाभ होईल मला विश्वास वाटतो. पंचायत समिती कल्याण, शिक्षण विभाग या कार्यालयाचा उपक्रम प्रत्येकाला नक्कीच मार्गदर्शक ठरेल. सारथी या पुस्तिकेला माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

# शुभेच्छा पुष्प

**मा.श्रीम.ललिता दहितुले**
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद,ठाणे.

'सारथी हे शिक्षण विभाग पंचायत समिती कल्याणतर्फे विशेष गरजाधारित मुलांसाठी प्रकाशित झालेले प्रथम पुस्तक आहे, याचा मला सार्थ अभिमान वाटतो. आजमितीला महाराष्ट्रात अशा खूप शाळा व संस्था आहेत ज्या केवळ विशेष गरजाधारित मुलांना शिक्षण देत आहेत. परंतु सर्वसमावेशित शिक्षणाने सर्वच शाळांची दारे ह्या मुलांसाठी खुली केली.परंतु आजही कित्येक मुले, पालक त्यांना मिळणाऱ्या लाभ, योजना ह्यापासून अनभिज्ञ आहेत. ह्या योजना लाभ त्यांच्यापर्यंत पोहचवायचे काम सारथी नक्की करेल. यासाठी पंचायत समिती कल्याण, शिक्षण विभाग मधील सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि खूप साऱ्या शुभेच्छा !

**मा. श्री. अशोक भवारी**
गटविकास अधिकारी
पंचायत समिती, कल्याण

पंचायत समिती कल्याणच्या समावेशित शिक्षण विभागाच्यावतीने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सारथी ही पुस्तिका प्रकाशित होत आहे ह्याचा विशेष आनंद होत आहे. प्रत्येक मूल हे शिकले पाहिजे हा एकच ध्यास समोर ठेवून त्यांच्यातील आत्मविश्वास दृढ करण्यासाठी दिव्यांग विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी, शिक्षकांसाठी एवढेच नव्हे तर समाजातील सर्व सुज्ञ नागरिकांसाठी मार्गदर्शक अशा विविध शासकीय सुविधा, शैक्षणिक योजना व नाविन्यपूर्ण उपक्रम 'सारथी' या पुस्तिकेत अंतर्भूत आहेत. दिव्यांगाना दिव्यांगत्व हे शाप न वाटता ते वरदान वाटले पाहिजे अशा प्रकारचे काम ही पुस्तिका करेल असा माझा ठाम विश्वास आहे. सदर उपक्रमास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

# अंत:स्वर

'समान संधी' या तत्वावर आधारित विशेष गरजा असलेल्या बालकांना सामान्य बालकांसोबत एकाच वर्गात शिकण्याची समान संधी मिळावी या उद्देशाने समावेशित शिक्षण विभाग कार्यन्वित झाला. सदर विभागामार्फत विविध लाभाच्या योजना राबवित असताना विशेषतज्ञ, विशेष शिक्षक यांच्या शाळाभेटी, गृहभेटी नियमित होत होत्या . या भेटी दरम्यान प्रकर्षाने लक्षात येणारी बाब म्हणजे पालक, नियमित शिक्षक हे समग्र शिक्षा मार्फतच नव्हे तर इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कित्येक योजनांबाबत अनभिज्ञ होते. हा गॅप भरुन काढण्याचा छोटासा प्रयत्न "सारथी" ने केला आहे. सदर पुस्तिकेत विशेष गरजाधारित मुलांसाठीचे विविध कायदे, शासन निर्णय, मार्गदर्शक सूचना, परिपत्रके तसेच समग्र शिक्षा, इतर विभागाच्या कल्याणकारी योजना **QR Code** सहित संकलित केल्या आहेत. सदर पुस्तिकेत शब्दांकित व चित्रांकित केलेल्या कल्याण तालुक्यातील उपक्रमात **On Call** समुपदेशनाला विशेष प्रतिसाद मिळाला. सदर उपक्रमामुळे विशेष गरजा असलेल्या मुलांना शिकविताना नियमित शिक्षकांना येणाऱ्या अडचणी, पालकांचे शंका निरसन तत्परतेने होऊ लागले. 'हर घर दिया' ची संकल्पना 'हर घर तिरंगा' तून जन्माला आली आणि पाहता-पाहता त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला. जवळ जवळ ७५० रंगबिरंगी दिवे तयार करुन विक्री करण्यात आले. मुलांच्या स्वकमाईचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर ओसांडून वाहत होता.

हे सगळे चालू असताना रोशनी, पूर्वा, प्रणय अशा कित्येक मुलांनी आम्हाला सदैव अभिमान वाटावा अशी वाटचाल चालू ठेवली. रोशनी जेव्हा कल्याण तालुक्यात दहावीत पहिली आली, त्यानंतर स्वखर्चाने ह्या मुलांचा गौरव पुरस्कार सुरु करायची कल्पना समावेशित टीमने प्रत्यक्षात सत्यात उतरवली आणि प्रत्येक वर्षी यशस्वीरित्या राबविली देखील.

ह्या पुस्तिकेतुन हा सर्व प्रवास मांडण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. तरीही काही योजनांबाबतीत शंका असतील तर तालुकास्तरावरील सर्व समावेशित टिमचे संपर्क क्रमांक नमुद आहेत. ह्या पुस्तिकेसाठी सर्वांनी विशेष श्रम घेतले असून ही पुस्तिका नावाप्रमाणेच सर्वांना मार्गदर्शक ठरेल अशी आशा वाटते.

शुभेच्छासह...

**डॉ. रुपाली खोमणे**

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती, कल्याण

# अंतरंग


१ २१ दिव्यांग प्रकार

२ अध्ययन शैली

३ कायदे, शासन निर्णय व परिपत्रक

४ समावेशित शिक्षण, समग्र शिक्षा योजना

५ वैद्यकीय प्रमाणपत्र

६ सेवा सुविधा उपलब्धता / स्थळ

७ समावेशित शिक्षण समग्र मार्फत मिळणारी मोफत साहित्य साधने

८ RTE Act २००९ व RPWD ACT २०१६ नुसार विद्यार्थ्यांना दिव्यांग प्रकारानुसार सुलभ प्रवेश व सहाय्यसाठी उपलब्ध सुविधा

९ दिनांक: १६/१०/२०१८ च्या शासन निर्णयानुसार इ. १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दिव्यांग प्रवर्गानुसार मिळणाऱ्या सवलती

१० समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद ठाणे ३% अपंग (दिव्यांग) कल्याण योजना

११ शैक्षणिक तक्रार निवारण व समुपदेशन केंद्र

१२ ''ON CALL समुपदेशन''

१३ हर घर दिया

१४ यशोगाथा

१५ क्षणचित्रे

# १ २१ दिव्यांग प्रकार



**१) पूर्णत: अंध (Totally Blind)**
- दृष्टीहीन.
- डोळे जन्मत: बंद असणे.
- अपघाती अंधत्व.



**२) अंशत: अंध (Low Vision)**
- अल्पदृष्टी.
- दूरचे/जवळचे कमी दिसणे.
- भिंगाच्या चष्म्याचा वापर.
- तिरळेपणा.



**३) कर्णबधीर / कर्णदोष (Hearing Impaired)**
- ऐकण्याची क्षमता अजिबात नसणे.
- ऐकू कमी येणे.
- कानातून पाणी येणे.
- कानाचा पडदा फाटणे.



**४) वाचादोष (Speech Impairment)**
- बोलण्यात अडखळणे.
- जीभ जाड असणे.
- जिभेचा शेंडा नसणे.
- तोतरे बोलणे.
- Clept Palate.
- टाळूला होल असणे.



**५) अस्थिव्यंग (Locomotor Impairment)**
- शारीरिक हालचालीस अक्षम असणे.
- हात किंवा पाय निष्क्रिय होणे.
- हालचाल करण्यास अक्षम.




**६) मानसिक आजार (Mental illness)**
- असामान्य किंवा अस्वाभाविक वर्तन.
- स्वत:शी बोलणे.
- अभिव्यक्त न होणे / भिती वाटणे.



**७) अध्ययन अक्षमता (Learning Disability)**
- लेखन वाचन गणितीय क्रिया अडचण.
- अभ्यासात मागे राहणे.
- समजण्यात अडचणी असणे.
- आकलन करण्यास अवघड.



**८) सेरेब्रल पाल्सी (Cerebral Palsy)**
- हातापायात आकड.
- मेंदूचा शरीरावर ताबा नसणे.
- हालचाल क्षमता कमी.



**९) ऑटीझम (Autism)**
- स्वत:च्या विश्वात हरवलेले असतात.
- समाजात कमी मिसळतात.
- आत्ममग्न असतात.



**१०) बहुविकलांग (Multiple Disability)**
- एकापेक्षा जास्त अपंगत्व.




**११) कुष्ठरोग निवारित (Leprosy Cured Person)**
- हातपायांच्या बोटांमध्ये विकृती.
- शरीराच्या त्वचेचा रंग बदलणे.
- हात किंवा पायांची बोटे सुन्न पडणे.



**१२) बुटकेपणा (Dwarfism)**
- शारीरिक गुणसुत्रामुळे शरीराची वाढ व विकास इतर मुलांपेक्षा कमी असणे.
- व्यक्ती वयस्कर होऊनही त्यांची उंची ४ फुट १० इंच पेक्षा कमी राहणे.



**१३) बौद्धिक अक्षमता (Intellectual Disability)**
- अध्ययन अध्यापन करण्यास समस्या.
- दैनंदिन क्रिया, सामाजिक व्यवहार करण्यास असमर्थ.
- समजणे आणि बोलणे /अभिव्यक्त करण्यास असमर्थ.
- वर्तणूक समस्या.



**१४) मांसपेशी दुर्विकास (Muscular Dystrophy)**
- शरीरातील मांसपेशी कमकुवत होणे व विकृती निर्माण होणे.
- दैनंदिन क्रिया करण्यास असमर्थ असणे.




**१५) मज्जासंस्थेचे तीव्र आजार (Chronic Neurological Condition)**
- फिट्स येणे.
- तीव्र स्वरुपात ताप येणे.
- मेंदूज्वर.
- ब्रेन ट्युमर.
- तीव्र डोकेदुखी.
- चेतासंस्थेमध्ये क्षती निर्माण होणे.



**१६) मल्टीपल स्केलेरोसीस (Multiple Sclerosis)**
- मेंदू व हाड यांच्या समन्वयात अडचण.




**१७) थॅलेसेमिया / कॅन्सर (Thalassemia)**
- रक्तामध्ये हिमोग्लोबिनची कमतरता.
- रक्ताच्या गाठी निर्माण होणे.
- शरीरात रक्ताची मात्रा कमी असणे.



**१८) हिमोफिलीया / अधिक रक्तस्राव (Hemophilia)**
- जखम झाल्यास रक्तस्त्राव अधिक होणे.
- रक्तस्त्राव बंद न होणे.
- रक्तस्त्राव बंद न झाल्याने शरीराचा भाग फुगणे.



**१९) सिकल सेल डिसीज (Sickle Cell Disease)**
- रक्ताचे प्रमाण कमी असणे.
- रक्ताच्या कमतरतेमुळे शरीराचे अवयव / अंग खराब होणे.
- शरीरातील पेशींच्या आकार C Type होतो.



**२०) ॲसिड हल्ला ग्रस्त (Acid Attack Victim)**
- शरीरावरील हात, पाय, डोळे यावर झालेला ॲसिडचा हल्ला.
- शरीरातील अवयव प्रभावित होऊन ते निकामी होणे.



**२१) पार्किंसन्स रोग (Parkinsons Disease)**
- हात/पाय/मांसपेशीमध्ये ताठरता
- तांत्रिकीय तंत्र प्रणाली संबधीत कठीण जाणे.
- हलनचलन क्रियेस अक्षमता.

# २ अध्ययन शैली

## अध्ययन शैली

### Visual Learner
**दृश्य अध्ययन शैली**

(कर्णदोष विद्यार्थ्यांसाठी)
वर्गामध्ये कर्णदोष असलेले विद्यार्थी या अध्ययन शैलीचा वापर करतात.
या शैलीचा वापर करताना शिक्षक अक्षर, शब्द, वाक्य, चित्रकार्ड यांचा वापर करु शकतात.
याशिवाय मोबाईल, संगणक, टॅब, प्रोजेक्टर, शिक्षकांचे सादरीकरण व प्रत्यक्ष अनुभव याचा वापर करुन दृश्य अध्ययन शैलीच्या विद्यार्थ्यांचे प्रभावी अध्ययन घडवून आणता येते.

### Tactile Learner
**स्पर्श अध्ययन शैली**

(अशंत: अंध, पुर्णत: अंध व बधिरांध विद्यार्थ्यांसाठी)
वर्गामध्ये अंशत: अंध, पुर्णत: अंध व बधिरांध असलेले विद्यार्थी हे अध्ययन अध्यापन करताना या शैलीचा वापर करतात.
प्रत्यक्ष वातावरणातील वस्तूचा अनुभव देणे.
स्पर्शाच्या माध्यमातून विविध अनुभव देता येतात.
उदा. डावा-उजवा, पुढे-मागे.
मॉड्यूलचा उपयोग करणे.

### Audio Learner
**श्राव्य अध्ययन शैली**

(अंध व दृष्टीदोष विद्यार्थ्यांसाठी)
वर्गामध्ये अंध व दृष्टीदोष असलेले विद्यार्थी जे श्रवण करुन अध्ययन करतात, त्या शैलीला श्राव्य शैली असे म्हणतात. या शैलीचा वापर करताना परिस्थितीनुसार रेडिओ, टेपरेकॉर्डर, मोबाईल, संगणक, लॅपटॉप, टॅब, प्रोजेक्टर, व विविध आवाज, तसेच संगीत साहित्य वगैरे सारख्या साहित्याचा वापर करता येतो.

### Multi Sensory Learner
**बहु अध्ययन शैली / बहु संवेदन शैली**

या शैलीचा वापर करुन विद्यार्थी शैक्षणिक, विकास करत असतात. बहु अध्ययन शैलीमध्ये वाचादोष, बधिरांध, अल्पदृष्टी, अध्ययन अक्षमता, अस्थिव्यंग, बहुविकलांग, मानसिक आजार, मेंदुचा पक्षाघात, स्वमग्नता यांचा समावेश होतो.

# ३ कायदे, शासन निर्णय व परिपत्रक

PWD Act 1995 The Person with Disability 1995

बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार २००९
दि. 28/10/2010 सां. क्र. -201005111438240O

दिव्यांगजन अधिकार अधिनियम दि. २७/१२/२०१६

दिव्यांग व्यक्तीसाठीचे महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण २०१८ अंमलबजावणी करणेबाबतचे शासन निर्णय दि. २०/०२/२०१९ सां. क्र. २०१९०२२११३०६४६०६२२

इ. १ ली ते इ. १२वी पर्यंतच्या विशेष गरजाधारक असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार मुल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलती संदर्भात मार्गदर्शन सुचना

अपंग व्यक्तीसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या ३% निधी नागरी भागातील अपंगांसाठी खर्च करण्याकरीता मार्गदर्शक सूचना दि. 28/08/2015 सां. क्र. - 201510281705271725

विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना इ. १ ली ते १२ वी पर्यंतच्या परीक्षामध्ये सोयी सवलती देण्याबाबत दि. 08/01/2016 सां. क्र. - 201601081741429521

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 (The Right of Persons with Disability Act - 2016) नुसार दिव्यांगत्व तपासणी मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठीच्या मार्गदर्शक सुचना दि. - 14 सप्टेंबर 2018 सां. क्र. - 201809111740104417

इ. १ ली ते १२ वी पर्यंतच्या विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैलीनुसार मुल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलती संदर्भात मार्गदर्शन सुचना दि. 16/10/2018 सां. क्र. - 201810161806468321

दिव्यांग व्यक्ती अधिकारासाठी अधिनियम 2016 (The Right of Person of Disability) Act - 2016 नुसार दिव्यांग विद्यार्थ्यांसंदर्भात च्या प्रवेशा संबंधित सर्व बाबींबाबत आणि अधिनियमातील कलम १६, १७ व ३१ अन्वये शाळांमध्ये उपलब्ध करुन घ्यावयाच्या सोयी व सुविधांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरावर सहसंचालक (प्रशासक) शिक्षण आयुक्तालय पुणे व जिल्हा / मनपा स्तरावर शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य) यांना नोडल तसेच कलम २३ अन्वये तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्त करणेबाबत दि. 30/07/2019 सां. क्र. 201907301221107721

विशेष गरजा असणाऱ्या अध्ययन सक्षम विद्यार्थ्यांचे वैद्यकिय व शैक्षणिक प्रमाणिकरण करण्यासाठी आरोग्य विभागात स्थापन करण्यात आलेल्या LD सेंटर मध्ये तपासणी करून देण्याबाबतचे परिपत्रक दि. २८/०८/२०१७

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राच्या धर्तीवर विद्या प्राधिकरणाच्या पुर्नरचनेनुसार समावेशित शिक्षण, जिल्हा व Diet समन्वयक विषयतज्ञ रिसोर्स टिचर यांनी संसाधन समुहामध्ये (DRG / BRG / CRG) समतात्मक दृष्टीकोनातून सुलभकांच्या भूमिकेत सदस्य म्हणून सहभागी होऊन शाळांचे सक्षमिकरण करणे बाबतचे परिपत्रक दि. 01/03/2011

अध्ययन अक्षम बालकांचे निदान व प्रामाणिकरण करण्यासाठी केंद्र स्थापन करणे (Unique Disability Idetify Card) ID ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे व शैक्षणिक उपचारात्मक सहाय्य दृष्टीकोनातून वैयक्तिक शैक्षणिक आराखडा तयार करुन अध्ययन अध्यापन सहाय्य समुपदेशन अमंलबजावणी करणेबाबतचे परिपत्रक दि. ०४/०५/२०१९

नोडल अधिकार तसेच तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्त करणेबाबतचे परिपत्रक - ३०/०७/२०१९
सां.क्र. २०१९०७३०१२२११०७७

इ. १ ली, इ. १२ वी पर्यंतच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षे करिता व अध्ययन -अध्यापन प्रक्रिया सुलभतेकरीता
लेखनिक / वाचक बँक तयार करणेबाबत दि. 11/01/2017 सां. क्र. - 201701111422334821

विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम पाठ्यपुस्तकाचे मुल्यमापन
योजनांचे परिपत्रक दि. 1/1/2021 http://www.maa.ac.in

इ. ९ वी ते इ. १० वी आणि इ. ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी सुधारीत विषय योजना
व मुल्यमापन योजनांचे परिपत्रक दि. १०/०२/२०२१

इ. १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांना शासकीय व अनुदानीत माध्यमिक शाळेत सुलभरितीने प्रवेश मिळवून
देणेबाबत दि. ६/१२/२०२२ सां. क्र. - २०२२१२०६१७०६००८७२१

दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता लेखनिक/वाचक उपलब्ध करणे बाबतचे परिपत्रक दि. २४/२/२०२१

इ. ९ वी, इ. १० वी आणि ११ वी, १२ वी सुधारित विषय योजना व मुल्यमापन योजना व मुल्यमापन योजनेच्या
अमंलबजावणीबाबतचे परिपत्रक दि. १०/२/२०२१

विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी लेखनिक देणेबाबत सूचना
दि.१५/२/२०१६ सा.क्र. २०१६०२१५१७२९३९२१२१

वरील सर्व शासन निर्णय www.maharashtra.gov.in उपलब्ध आहे.

'मिळून सारे ग्वाही देऊ, दिव्यांगाना सक्षम बनवू!'

# ४ समावेशित शिक्षण, समग्र शिक्षा योजना

**समावेशित शिक्षण अंतर्गत ० ते १८ वयोगटातील विशेष गरजा धारक दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमित शाळांमध्ये प्रवेश करुन त्यांच्या गरजेप्रमाणे मोफत सुविधा व सवलती देत आहेत.**

## मदतनीस भत्ता

जिल्हा शल्य चिकित्सकांच्या तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेल्या, शस्त्रक्रिया झालेले, थेरपीची गरज असलेल्या अशा विशेष गरजा धारक बालकांना स्वतःहून शाळेमध्ये येताना अडचणी उद्भवतात अशा विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी मदतनीस आवश्यक असतो. त्यांना मदतनीसच्या सहाय्याने शाळेत येता यावे यासाठी दरमहा ६००/-रु. प्रमाणे १० महिन्यांसाठी ६०००/- रु. मदतनीस भत्ता अदा करण्यात येईल.

## प्रवासभत्ता / परिवहन भत्ता

विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना इयत्ता प्रमाणे गावात शाळा उपलब्ध नसल्यास किंवा निमशहरी व शहरी भागात शाळेचे अंतर ३ किमी पेक्षा अधिक असल्यास अशा वेळी त्यांना सुरक्षितपणे नियमित शाळेत येण्याजाण्यासाठी प्रवासभत्ता अदा करण्यात येतो. तसेच थेरपीची आवश्यकता असणाऱ्या विद्यार्थ्यांना थेरपी सेंटर मध्ये ये-जा करण्यासाठी प्रत्यक्ष प्रवास भत्ता १० महिन्यासाठी दरमहा ६००/- रु प्रमाणे ६०००/- अदा करण्यात येतो.

## वाचक / लेखनिक भत्ता

विशेष गरजा धारकांना दृक अध्ययन शैलीच्या विद्यार्थ्यांना अध्ययन सुलभ होण्याच्या दृष्टीने, गोष्ट व करपल्लवी /जेस्टर्सचा वापर करुन सहाय्य करणाऱ्या वाचकाला व लेखनिकाला मंजुर करण्यात येतो. दरमहा २००/-रु. प्रमाणे १० महिन्यांसाठी २०००/- रु. वाचक / लेखनिक भत्ता अदा करण्यात येतो. सदर लाभ शैक्षणिक वर्षाकरिता देण्यात येतो.

## दिव्यांग मुलींना प्रोत्साहन भत्ता

बालकाचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार विशेषतः दिव्यांग मुलींना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करुन त्यांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. (दिव्यांग प्रमाणपत्र ४०% आवश्यक) त्यांना १० महिन्यांकरिता दरमहा २००/- रु. प्रमाणे २०००/-रु. अदा करण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे :**
- पालकांचा मागणी अर्ज
- विद्यार्थ्याचे आधारकार्ड
- पालक/विद्यार्थ्याचे बँक पासबुक
- दिव्यांग प्रमाणपत्र
- विद्यार्थ्याचे शालेय उपस्थिती प्रमाणपत्र

**पूर्व प्राथमिक/ प्राथमिक/माध्यमिक**

**लाभार्थी - सर्व दिव्यांग प्रवर्ग**

# समावेशित शिक्षण विभाग, समग्र मार्फत ॲलिम्को साहित्य /मोजमाप शिबीर




'उठ दिव्यांग जागा हो, समाजाचा धागा हो!'

# वैद्यकीय सेवा व सुविधा

**● श्रवण चाचणी**

मुलांच्या श्रवण क्षमतेची चाचणी केली जाते. या चाचणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा श्रवणदोष ओळखून त्या प्रकारचे उपचार व कानाचे मशिन दिले जाते.

**● दृष्टिदोष तपासणी**

विद्यार्थ्यांच्या डोळ्याची तपासणी केली जाते. योग्य निदान झाल्यानंतर तीव्रता पूर्व निदान व इतर बाबी जाणून घेता येतात.

**● बुद्ध्यांक तपासणी**

विद्यार्थ्यांची बौद्धिक कार्यक्षमता ओळखणे आणि मोजणे अशा दोन पद्धतीचा वापर केला जातो. या चाचण्या भारतीय संदर्भानुसार प्रमाणित केल्या आहेत.

**वर्ग शिक्षक, विशेषतज्ञ, विशेष शिक्षक यांच्यामार्फत सर्वेक्षणामधून होणाऱ्या प्राथमिक मुल्यमापनानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक त्या वैद्यकीय सेवा व सुविधा देऊन विद्यार्थ्यांची शैक्षणिक, वैद्यकीय गुणवत्ता वाढवणे. सदर तपासणी विनामुल्य असून प्रवासभत्ता देय आहे.**

**● बेरा तपासणी**

लहान मुलांच्या दोन्ही कानांची ऐकण्याची क्षमता हे श्रवण आलेखाद्वारे समजते.

**● ENT तज्ञ**

विद्यार्थ्यांची नाक, कान, घसा तपासणी केली जाते. कमी ऐकु येणे, टाळू फाटलेले असणे असे निदान दिसून आल्याने विद्यार्थ्यांची औषधोपचार, शस्त्रक्रिया मार्फत औषधोपचार केले जातात.

**● अध्ययन अक्षम मुल्यांकन व मुल्यामापन**

विशिष्ठ अध्ययन अक्षमता निश्चित करण्यासाठी व क्षमतेचे स्वरुप तीव्रता निश्चित करण्यासाठी विस्तृत व विशिष्ठ मुल्यांकन व मुल्यमापन केले जाते.

**● शस्त्रक्रिया**

जिल्हा शल्यचिकित्सकाद्वारे, तज्ञांद्वारे विद्यार्थ्यांची मोफत शस्त्रक्रिया केली जाते. टाळू फाटणे, ओठ फाटणे, कानाचा पडदा फाटणे, डोळ्याची शस्त्रक्रिया, कॉकलिया इम्प्लांट, हात व पायाची शस्त्रक्रिया केली जाते.

**● औषधोपचार**

वैद्यकीय तपासणी नंतर विद्यार्थ्यांना मोफत औषधोपचार दिले जातात.

# वैद्यकिय तपासणी व शिबीर










समावेशित शिक्षण, समग्र शिक्षा अतंर्गत विशेष गरजाधारक दिव्यांग विद्यार्थ्यांची मोफत वैद्यकिय तपासणी, बुध्यांक तपासणी करण्यात आली तसेच टायटन आय व समग्र शिक्षा यांच्या समन्वयाने दृष्टीदोष तपासणी करुन विद्यार्थ्यांना मोफत चष्मे व दिव्यांग प्रमाणपत्र वाटप करण्यात आले त्याची क्षणचित्रे...











# ५ वैद्यकीय प्रमाणपत्र

जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या तपासणीमधून विद्यार्थी हा दिव्यांग असेल तर त्याला दिव्यांग प्रवर्गतील विद्यार्थ्यांना गरजेनुरुप मोफत वैद्यकीय दिव्यांग प्रमाणपत्र दिले जाते. दिव्यांग प्रवर्गनिहाय त्यांच्या शालांत परिक्षेसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता प्रवर्गनिहाय त्यांच्या गरजेनुसार परिक्षेसाठी सवलती मिळवण्याकरिता "महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ" यांच्यामार्फत देण्यात आलेल्या प्रस्तावाकरिता आवश्यक महत्वाचा फॉर्म शालांत परिक्षेचा प्रस्ताव करतात. विद्यार्थ्यांच्या फॉर्मची निवड करणे आवश्यक आहे. www.mahasscboard.in या संकेतस्थळावर फॉर्म उपलब्ध आहे.

आवश्यक कागदपत्रे

- पासपोर्ट साईज दोन फोटो
- रेशन कार्ड (सत्यप्रत आणि एक झेरॉक्स प्रत)
- आधार कार्ड आवश्यक (सत्यपत्र आणि झेरॉक्स प्रत)
- शाळेचे बोनाफाईड
- UDID प्रमाणपत्र

## UDID (स्वावलंबन) कार्ड







आवश्यक कागदपत्रे

- पासपोर्ट साईज दोन फोटो
- आधार कार्ड आवश्यक (सत्यपत्र आणि झेरॉक्स प्रत)
- विद्यार्थ्याची वैयक्तिक माहिती
- रेशन कार्ड (सत्यप्रत आणि एक झेरॉक्स प्रत)
- शाळेचे बोनाफाईड
- दिव्यांगाचा दाखला/प्रमाणपत्र

# ६ सेवा सुविधा उपलब्धता / स्थळ

## मोफत वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्याचे ठिकाण

१.जिल्हा सामान्य रुग्णालय ठाणे (सिव्हिल हॉस्पिटल )जिल्हा ठाणे
प्रमाणपत्र प्राप्त वार वेळ बुधवार सकाळी ९.०० ते १२.०० वाजेपर्यंत
२.छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल कळवा
३.मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर (सेंट्रल हॉस्पिटल), उल्हासनगर
प्रमाणपत्र प्राप्ती वार बुधवार वेळ स. ९.०० ते दु. १२.०० वाजेपर्यंत
४.रुक्मिणी बाई शासकीय रुग्णालय, कल्याण
प्रमाणपत्र प्राप्ती वार पहिला व तिसरा बुधवार वेळ दु. २.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत

## मोफत OT/PT थेरेपी सुविधा मिळण्याचे ठिकाण

**१.MPRTC सेंटर**
(बहुउद्देशीय संशोधन प्रशिक्षण केंद्र)
पत्ता : मु.पो. शेलार जि.प.शाळा शेलार
ता. भिवंडी जि. ठाणे

**२. OT/PT सेंटर शहापूर (थेरपी कक्ष)**
पत्ता : ओटीपीटी सेंटर शहापूर जि. प. शाळा
शहापूर नं.१, तहसील कार्यालयाजवळ,
ता. शहापूर, जि. ठाणे.
वेळ:- स. १०.०० ते सायं. ४.०० वाजेपर्यंत

**३.OT/PT सेंटर वालधुनी**
(थेरेपी कक्ष कल्याण डोंबिवली मनपा)
पत्ता : शाळा क्रमांक ८, स्वातंत्र्यवीर सावरकर
शिवाजीनगर, पाण्याचे टाकीजवळ,
वालधुनी, कल्याण पूर्व.
वेळ :- स.१०.३० ते
सायं. ५.०० वाजेपर्यंत

## संपर्क कार्यालय

- प्राचार्य जिल्हा शैक्षणिक व प्रशिक्षण संस्था, समावेशित शिक्षण विभाग, रहाटोली जिल्हा ठाणे.
- शिक्षणाधिकारी, समावेशित शिक्षण समग्र शिक्षा विभाग, जिल्हा परिषद ठाणे.
- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कल्याण.
- गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती कल्याण.
- सर्व ग्रामपंचायत कार्यालय, कल्याण
- गटसाधन केंद्र गोवेली समावेशित शिक्षण, समग्र शिक्षा विभाग, पंचायत समिती कल्याण.

## ७ समावेशित शिक्षण समग्र मार्फत मिळणारी मोफत साहित्य साधने

### कर्णबधीर प्रवर्गासाठी

- श्रवणयंत्र
- स्पीच ट्रेनर इ.

### अंध प्रवर्गासाठी

- पांढरीकाठी
- स्मार्ट केन
- ब्रेल किट
- ब्रेल पुस्तके
- ब्रेलर
- सीडी प्लेयर
- डेझी प्लेयर

### अंशत: अंध प्रवर्गासाठी

- चष्मे
- लो-व्हिजन किट
- लार्ज प्रिंट पुस्तके
- सर्व प्रकारचे मॅग्निफायर ग्लासेस इ.

### अस्थिव्यंग / मेंदूच्या पक्षाघात / बुटकेपणा / स्नायुंची विकृती / मल्टीपल स्क्लेरोसिस / पार्किंसन्स / बहुविकलांग या प्रकारासाठी

- व्हीलचेयर
- तीन चाकी सायकल
- क्रचेस
- रोलेटर
- वॉकर
- कॅलिपर
- स्प्लिंट
- CP चेअर
- कॉर्नर सिटींग इ.

# शैक्षणिक साहित्य वाटप











समावेशित शिक्षण समग्र शिक्षा, जि.प. ठाणे अंतर्गत कल्याण गटातून
अंशत: अंध विद्यार्थ्यांना लार्ज प्रिंट पुस्तके
व विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांना ऑलिम्को साहित्ये मोफत वाटप
करतानाची क्षणचित्रे...





## ८ RTE Act २००९ व RPWD ACT २०१६ नुसार विद्यार्थ्यांना दिव्यांग प्रकारानुसार सुलभ प्रवेश व सहाय्यसाठी उपलब्ध सुविधा

| सुविधा | दिव्यांग प्रकार |
|---|---|
| मदतनीस भत्ता | पूर्णत: अंध, अंशत: अंध, अस्थिव्यंग, मेंदूचा पक्षाघात, स्वमग्नता, बहुविकलांग, कुष्ठरोग मुक्त, बौद्धिक अक्षमता, स्नायुंची विकृती, मज्जासंस्थेचे तीव्र आजार, मल्टिपल स्क्लेरोसिस, थॅलेसेमिया, हिमोफिलीया, ॲसिड हल्ला ग्रस्त, पार्किंसन्स ग्रस्त |
| परिवहन भत्ता<br>प्रोत्साहन भत्ता (मुली)<br>सर्व प्रकारचे साहित्य साधने<br>शिष्यवृत्ती (समाज कल्याण)<br>थेरपी सुविधा<br>गृह आधारित शिक्षण<br>२५% प्रवेश (RTE)<br>प्रमाणपत्र UDID कार्ड<br>शस्त्रक्रिया | पूर्णत: अंध, अंशत: अंध, कर्णबधिर, वाचा भाषा दोष, अस्थिव्यंग, मानसिक आजार, अध्ययन अक्षम, मेंदूचा पक्षाघात, स्वमग्नता, बहुविकलांग, कुष्ठरोग मुक्त, बुटकेपणा, बौद्धिक अक्षमता, स्नायुंची विकृती, मज्जासंस्थेचे तीव्र आजार, मल्टिपल स्क्लेरोसिस, थॅलेसेमिया,हिमोफिलीया, सिकलसेल, ॲसिड हल्ला ग्रस्त, पार्किंसन्स ग्रस्त |
| ब्रेल पुस्तक | पूर्णत: अंध /बधिरांध |
| ठळक अक्षरातील पुस्तक | अंशत: अंध |

## १ दिनांक : १६/१०/२०१८ च्या शासन निर्णयानुसार इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दिव्यांग प्रवर्गानुसार मिळणाऱ्या सवलती

| सवलत | दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|
| अतिरिक्त २० मिनिटे<br>अतिरिक्त २० गुण<br>लेखनिक<br>शैक्षणिक साहित्य | पूर्णत: अंध, अंशत: अंध, अस्थिव्यंग, मानसिक आजार, अध्ययन अक्षम, मेंदूचा पक्षाघात, स्वमग्नता, बहुविकलांग, कुष्टरोग मुक्त, बुटकेपणा, बौद्धिक अक्षमता, स्नायुंची विकृती, मज्जासंस्थेचे तीव्र आजार, मल्टिपल स्क्लेरोसिस, थॅलेसेमिया,हिमोफिलीया, सिकलसेल, ॲसिड हल्ला ग्रस्त, पार्किंसन्स ग्रस्त, इतर आजार |
| विषय योजना | पूर्णत: अंध, अंशत: अंध, कर्णबधिर, वाचाभाषा दोष, मानसिक आजार, अध्ययन अक्षम, स्वमग्नता, बहुविकलांग, बौद्धिक अक्षमता, गतिमंद, इतर आजार |
| अनुकूलित प्रश्नावली | पूर्णत: अंध, अंशत: अंध, अस्थिव्यंग, मानसिक आजार, अध्ययन अक्षम, मेंदूचा पक्षाघात, स्वमग्नता, बहुविकलांग, बौद्धिक अक्षमता, स्नायुंची विकृती, मज्जासंस्थेचे तीव्र आजार, मल्टिपल स्क्लेरोसिस, थॅलेसेमिया, हिमोफिलीया, सिकलसेल, ॲसिड हल्ला ग्रस्त, पार्किंसन्स ग्रस्त, इतर आजार |
| मौखिक परिक्षा | पूर्णत: अंध, अंशत: अंध, अस्थिव्यंग, मानसिक आजार, अध्ययन अक्षम, मेंदूचा पक्षाघात, स्वमग्नता, बहुविकलांग, बौद्धिक अक्षमता, स्नायुंची विकृती, मज्जासंस्थेचे तीव्र आजार, मल्टिपल स्क्लेरोसिस, ॲसिड हल्ला ग्रस्त, इतर आजार |
| प्रात्यक्षिक सूट | गरजेनुसार (पूर्णत: अंध, अंशत: अंध, वाचा भाषा दोष, अस्थिव्यंग, अध्ययन अक्षम, मेंदूचा पक्षाघात, स्वमग्नता, बहुविकलांग, बौद्धिक अक्षमता, गतिमंद, स्नायुंची विकृती, मज्जासंस्थेंचे तिव्र आजार, मल्टीपल स्क्लेरोसिस, थॅलेसेमिया, हिमोफिलीया, सिकलसेल, ॲसिड हल्ला ग्रस्त, पार्किंसन्स ग्रस्त, इतर आजार) |
| आकृत्या / नकाशे सूट | पूर्णत: अंध, अंशत: अंध, वाचा भाषा दोष, अस्थिव्यंग, अध्ययन अक्षम, मेंदूचा पक्षाघात, स्वमग्नता, बहुविकलांग, बौद्धिक अक्षमता, गतिमंद, स्नायुंची विकृती, मज्जासंस्थेंचे तिव्र आजार, मल्टीपल स्क्लेरोसिस, थॅलेसेमिया, हिमोफिलीया, सिकलसेल, ॲसिड हल्ला ग्रस्त, इतर आजार) |
| बैठक व्यवस्था | गरजेनुसार (सर्व दिव्यांग प्रकार) |
| व्याकरणाबाबत सवलती | कर्णबधिर, वाचा भाषा दोष, बौद्धिक अक्षमता, गतिमंद |
| स्पेशल पर्यवेक्षक | मानसिक आजार, मल्टिपल स्क्लेरोसिस, थॅलेसेमिया, हिमोफिलीया, सिकलसेल, ॲसिड हल्ला ग्रस्त |

# १० समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद ठाणे ३% अपंग (दिव्यांग) कल्याण योजना

### बौद्धिक अक्षमता — शैक्षणिक साहित्य संच, बुध्दिमत्ता चाचणी संच पुरविणे

- महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असलेबाबत प्रमाणपत्र.
- अपंगत्व ४०%किंवा त्यापेक्षा जास्त असलेबाबत जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे अध्यक्षते खालील त्रिस्तरीय सदस्य समितीचे वैद्यकीय प्रमाणपत्र.
- लाभार्थीने यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- लाभार्थी चे वय १८ वर्षेपर्यंत असून तो शाळेत शिक्षण घेणारा असावा.

### अंध, कर्णबधिर व अस्थिव्यंग — शालांत पुर्व शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

- महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असलेबाबत प्रमाणपत्र.
- अपंगत्व ४०%किंवा त्यापेक्षा जास्त असलेबाबत जिल्हा शल्यचिकित्सक यांचे अध्यक्षते खालील त्रिस्तरीय सदस्य समितीचे वैद्यकिय प्रमाणपत्र.
- विद्यार्थी एकाच इयत्तेत दोन वेळा नापास झालेला नसावा.

### अंध, कर्णबधिर व अस्थिव्यंग — इ. १० वी पर्यंत व नंतरचे शिक्षण घेणारे दिव्यांग विद्यार्थ्यांना

- महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असलेबाबत प्रमाणपत्र.
- अपंगत्व ४०% किंवा त्यापेक्षा जास्त असलेबाबत जिल्हा शल्यचिकित्सक यांचे अध्यक्षते खालील त्रिस्तरीय सदस्य समितीचे वैद्यकिय प्रमाणपत्र.
- विद्यार्थी एकाच इयत्तेत दोन वेळा नापास झालेला नसावा.

### अंध, कर्णबधिर, अस्थिव्यंग व बौद्धिक अक्षमता — अर्थ सहाय्य दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेली प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती

- अनुदानित शाळांतील इ. १ वी व इ. १० वी चे दिव्यांग विद्यार्थी.
- दिव्यांग ४० टक्के प्रमाणपत्र.
- एका इयत्तेला एका शैक्षणिक वर्षासाठीच लागू.
- एकाच पालकाच्या २ पेक्षा अधिक सक्षम (दिव्यांग) पाल्यांना ही शिष्यवृत्ती लागू नाही. मात्र दुसरे अपत्य जुळे असल्यास त्यांना सदर शिष्यवृत्ती लाभ देता येईल.
- पालकांचा उत्पन्नाचा दाखला.

### सर्व प्रकारचे दिव्यांग — शासकीय संस्थांमधून व स्वयंसेवी संस्थांमधून दिव्यांगाचे शिक्षण आणि प्रशिक्षण

- महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असलेबाबत प्रमाणपत्र.
- दिव्यांगत्व ४०%किंवा त्यापेक्षा जास्त असलेबाबत जिल्हा शल्यचिकित्सक यांचे अध्यक्षतेखालील त्रिस्तरीय सदस्य समितीचे वैद्यकिय प्रमाणपत्र.

## संपर्क कार्यालयाचे नाव

- समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे
- गटविकास अधिकारी पंचायत समिती, कल्याण
- ग्रामपंचायत ग्रामसेवक

# ११ शैक्षणिक तक्रार निवारण व समुपदेशन केंद्र

● उद्दिष्टये : विशेष गरजाधारित विद्यार्थ्यांना नजिकच्या शाळेत प्रवेश देणे, समानतेतुन संधी अंतर्गत सर्व कार्यक्रम व उपक्रमात सहभागाची संधी उपलब्ध करणे, वाहतुक व मदतनीसाची गरज असलेल्या विद्यार्थ्यांस मदतनीसाची सुविधा उपलब्ध करुन देणे, दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक व सामाजिक विकासाचे सातत्य राखले जाईल यासाठी सांकेतिक भाषा व ब्रेलचा उपयोग करणे, मोफत पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य साधने योग्य उपकरणे व स्वतंत्रपणे हालचाल करण्यास अडथळाविरहित वातावरण निर्माण करणे, अध्ययनातील आव्हाने ओळखून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार सुलभ अशा आधुनिक अध्यापन पध्दती व मुल्यांकन पध्दतींचा वापर करणे, तसेच सर्व शाळांना मदत होण्यासाठी व्यावसायिक तज्ञांना व कर्मचारी वर्गास समावेशित शिक्षणातंर्गत प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित करणे, शैक्षणिक तक्रार निवारण व समुपदेशन केंद्रामार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांचे अध्ययन अध्यापन प्रक्रिया विकसित करणे व आवश्यकतेनुसार नियोजन करुन काम करणे.

या उद्देशपुर्तीसाठी प्रत्येक राज्यात, जिल्ह्यात व तालुकास्तरावर नोडल अधिकारी व तक्रार निवारण अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## गटसाधन केंद्र गोवेली, पंचायत समिती कल्याण यांचे संपर्क क्रमांक

डॉ. रुपाली खोमणे
गटशिक्षणाधिकारी
८२०८६९३५०१

श्रीम. विद्या नाईकवाडी
गट समन्वयक तथा विस्तार अधिकारी
९०२९५९०८४२

श्री. किरण लोखंडे
विशेषतज्ञ
९२८४९६०५७८

श्रीम. वैशाली शिंदे
विशेषतज्ञ
९४२२८६९६८६

श्री. धिरज ननावरे
विशेष शिक्षक
९२२४९८९९५०

सौ. प्रज्ञा साखरे
विशेष शिक्षिका
९९६०१२४४७५

सौ. सिमा देशमाने
विशेष शिक्षिका
९०८२७३४८८७

श्री. रवि सोनावणे
स्पिच थेरपिस्ट
९८९२२१०२२५

श्री. किरण हजारे
विशेष शिक्षक
७२०८४१६५४४

# १२ "ON CALL समुपदेशन"

समग्र शिक्षा अभियानांतर्गत कल्याण गटातून विशेष गरजाधारक दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

उद्दिष्ट्ये :
- विशेष गरजाधारक मुलांना जवळच्या शाळेत प्रवेश देऊन त्यांना समावेशनाकडून शिक्षणाकडे घेऊन जाणे.
- शाळाभेटी दरम्यान शाळास्तरावर वर्गशिक्षकांना दिव्यांग विद्यार्थ्यांचे शालेय समावेशन व वर्ग अध्ययन अध्यापन करताना येणाऱ्या आव्हानांची उपाययोजना करणे.

कार्यपद्धत :
- शालेय व गृहभेटी दरम्यान येणाऱ्या आव्हानांची यादी तयार केली जसे, मुलांची तपासणी नोंदी, वर्तन, निकाल व प्रगतीपत्रक, शाळेतील उपस्थिती, आकारीत व संकलित (CCE) मुल्यमापनाच्या नोंदी, अनुकुलित अभ्यासक्रम, पालक, विद्यार्थ्यांमधील असुरक्षितपणा.
- समावेशित शिक्षण विभागातील विशेषतज्ञ व विशेष शिक्षक यांचे भ्रमणध्वनी सर्व शाळांना संपर्कासाठी देण्यात आले.
- On Call समुपदेशन या उपक्रमाची संपूर्ण माहिती जसे, साहित्याची नावे, वैद्यकीय सेवा, भत्ता, संपर्क क्रमांक अशा सर्व माहितीचे माहितीपत्रक तालुकास्तरावर तयार करुन त्याचे केंद्रस्तरावर वाटप केले.
- सदर उपक्रम सुरु झाल्यामुळे प्रत्येक पालकांचे, शिक्षकांचे मुख्याध्यापकांचे कॉल येणे सुरु झाले. यातुन तक्रारीचे तात्काळ निवारण होऊ लागले.
- बालकांच्या आवश्यकतेनुसार, प्रत्यक्ष शाळा भेटीमधून, शिक्षण परिषेदमधून, शाळा स्तरावरील येणारी आव्हाने व त्यावरील उपाययोजना समावेशित टिमद्वारे समुपदेशन करण्यात येत आहे.

फलनिष्पती :
- प्रत्यक्षात संपर्क वाढल्याने सेवा सुविधा, शिबिर, प्रशिक्षण, नाविण्यपूर्ण उपक्रमाची माहिती, शासकीय योजना, अध्यापन पद्धती, अध्ययन शैली, शाळा स्तरावर समजून देण्यास सुलभ होत आहे.
- आतापर्यंत सदर उपक्रमाचा ४५३ विद्यार्थ्यांना लाभ घेता आला आहे व पुढेही घेत आहेत.

# “ON CALL समुपदेशन”






























**ऑन कॉल समुपदेशन उपक्रमाच्या माध्यमातून**
**प्रत्यक्षात शाळास्तरावर मुख्याध्यापक, शिक्षक, दिव्यांग विद्यार्थी,**
**पालकांना त्यांच्या गरजेनुसार**
**विशेष तज्ञ व विशेष शिक्षक समुपदेशन करत असतानाची क्षणचित्रे...**



# १३ हर घर दिया

**उद्दिष्ट्ये :**

- सामूहिक कृतीतून सामाजिक कौशल्य विकसित करणे
- विशेष गरजाधारित दिव्यांग मुलांमध्ये स्वप्रतिष्ठा, आत्मविश्वास वाढविणे.
- शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्यामध्ये सुसंवाद व समन्वय साधणे.
- सामान्य मुले व दिव्यांग यांच्यात सकारात्मक वातावरण तयार करणे.
- दिव्यांग विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे.
- व्यावसायिक कौशल्याचा विकास करणे.

**कार्यपद्धती :**

- सामान्य मुले व दिव्यांग विद्यार्थी जि.प. शाळा निळजे केंद्र खोणी येथे दिवाळी पूर्व मेळाव्याचे आयोजन केले.
- सदर मेळाव्यात दिव्यांग मुलांसोबत सामान्य मुले, पालक, शिक्षक यांचा उत्स्फुर्त सहभाग नोंदविण्यात आला.
- समावेशित टिमच्या स्वखर्चाने सदर मेळावा घेण्यात आला.
- पालक, शिक्षक, विद्यार्थी यांच्या परस्पर संवाद, सहकार्य, समन्वय विकसित करणे यासाठी गट तयार करण्यात आले.
- सदर गटातून पालक शिक्षकांमधून विद्यार्थ्यांची गुणवत्तेच्या विकास घडविण्यासाठी विविध चर्चा घडवून आणल्या.
- दिव्यांग विद्यार्थी व सामान्य मुलांमध्ये मैत्रीची भावना निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी स्वप्रेरणेने सहभाग घेतला.

**फलनिष्पती :**

- सदर मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची एकाग्रता व आत्मविश्वास वाढला.
- परस्पर चर्चेतून विविध योजनांचा प्रसार.
- ७५० पेक्षा अधिक पणत्या तयार झाल्या व त्याचा विक्री स्टॉल शाळेत मांडण्यात आला.
- या पणत्यांच्या विक्रितून मिळालेल्या निधीचे बक्षीस स्वरुपाने त्याच विद्यार्थ्यांना देण्यात आले.









## १४ यशोगाथा



### तिमिरातुन प्रकाशाकडे...

रोशनी ही उत्कृष्ट विद्यार्थी, गायिका, बुद्धिबळपटू, जलतरणपटू आहे. दृष्टी आणि जन्मापूर्वी उद्भवणाऱ्या कोणत्याही समस्येचे उत्तर आपल्या विज्ञानाकडे नाही. रोशनीच्या डोळ्याचा पडदा अविकसित असल्याकारणाने ती पाहु शकत नाही हे माहित असताना आता आपल्याला सत्यासोबत जगण्याशिवाय पर्याय नाही म्हणुन सत्य तिने व तिच्या कुटूंबाने आनंदाने स्वीकारले.

रोशनीने राहत्या घराजवळ "सनशाइन नर्सरी" मध्ये सामान्य मुलांबरोबर शिक्षण घेण्यात सुरुवात केली. रोशनी नर्सरी गटातील उत्कृष्ट विद्यार्थिनी होती. रोशनीला दृष्टीदोष असल्यामुळे इ. १ली साठी जवळपासच्या शाळांनी प्रवेश नाकारला. त्याच दरम्यान समावेशित शिक्षण विभाग सर्वेक्षणातून विशेषतज्ञ वैशाली शिंदे, विशेष शिक्षिका प्रज्ञा साखरे व स्पिच थेरेपिस्ट रवि सोनावणे यांची पालकांशी भेट झाली. त्यावेळी तिची case study करुन शालेय प्रवेशासाठी समावेशित टिमने बरेच परिश्रम घेतले. यातच सेक्रेड हार्ट स्कूलचे संस्थापक श्री.अल्बिन चिआडन यांनी रोशनीला तत्काळ प्रवेश दिला व तिच्या जडणघडणामध्ये समावेशित शिक्षण व शाळा यांनी महत्वाची भुमिका निभावली.याचाच परिपाक म्हणजे रोशनी सलग तीन वर्ष वॉईस ऑफ सिक्रेड हार्ट ही पदवी चार वेळा जिंकू शकली.



दृष्टी नसतानाही तिने तिच्या शैक्षणिक क्षेत्रात कोणालाच निराश केले नाही आणि तिच्या शाळेतील सोबत्यांच्या बरोबरीने १०वीला ९५.६% गुण मिळवुन कल्याण तालुक्यात पहिली आली. यानिमित्त तिचा पंचायत समिती कल्याण व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था रहाटोली, यांच्यावतीने गुणगौरव करण्यात आला.

रोशनी ही शैक्षणिक स्तराबरोबर उत्कृष्ट गायन व जलतरणपटू देखील आहे. गोंदिया (महाराष्ट्र) - २०२० आणि बेंगळुरू (कर्नाटक) - २०२१ येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत अनेक सुवर्णपदक जिंकणारी राष्ट्रीय स्तरावरील सुवर्णपदक विजेती आहे. सध्या ती डेहराडून मधून सायन्स घेऊन B-Tech प्रवेशासाठी JEE चीही तयारी करत आहे. रोशनीची ही वाटचाल कित्येक दिव्यांगासाठी आशेचा किरण आहे. समावेशित शिक्षण कल्याणला तिच्या कर्तत्वाचा नेहमीच अभिमान वाटेल.



# इ.१०वी व इ.१२ वी दिव्यांग विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा



रोशनीने सन २०२१ मध्ये कल्याण तालुक्यामध्ये ९५.०६% गुण प्राप्त करुन प्रथम क्रमांक मिळविला तेव्हापासून इ. १० वी व इ. १२वीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा करण्यास कल्याण तालुक्याने सुरुवात झाली त्याची क्षणचित्रे...

















# <u>पूर्वा-एक विकासाचे पर्व</u>

पूर्वा जि. प. शाळा आजदे येथे सध्या ती आठवीत शिकत आहे. पूर्वा ही जन्मत: बौद्धिक अक्षम आहे तसेच तिची जीभ जड असल्याने तिला स्पष्ट बोलता येत नाही. ती अडखळत बोलण्याचा प्रयत्न करते. परंतु पूर्वाला शिक्षणाची आवड आहे. ती साधे शब्द वाचते, बिनहातच्याची बेरीज व वजाबाकी करते, १ ते १० पर्यंत अंक ओळखते, १ ते १०० पर्यंत अंक तोंडी बोलते, A to Z पर्यंत बोलता येते आणि बघून लिहिताही येते.

विशेष शिक्षिकेच्या अध्ययन-अध्यापन तंत्रपद्धतीच्या प्रशिक्षणचा या केस मध्ये विशेष उपयोग करण्यात आला. पूर्वा लाजाळु व शांत असल्यामुळे तिला इतर मुलांमध्ये मिसळण्यास कठिण जात होते. परंतु विशेष शिक्षक व नियमित शिक्षकांनी इतर मुले व तिच्यात सुसंवाद घडवून आणण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. याचा परिपाक म्हणजे शाळेतील एका विद्यार्थीनीने शाळेतील प्राथमिक अभ्यासक्रम शिकवण्याची जबाबदारी आनंदाने स्विकारली. समग्र शिक्षाच्या योजनातुन मदतनीस नेमल्यामुळे पूर्वा नियमित शाळेत येऊ लागली. कथा कथन पध्दती, चर्चा याचा विशेष उपयोग करुन तिच्यातला आत्मविश्वास वाढविण्यात आला. आज पूर्वा स्वत:च्या पायावर उभी राहण्याचे स्वप्न पाहते याचा विशेष अभिमान वाटतो.







# १५ क्षणचित्रे

## अवलंबनातून स्वावलंबनाकडे...



समावेशित शिक्षण विभाग, समग्र शिक्षा पंचायत समिती कल्याण आयोजित "संवाद सांकेतिक भाषेमधून"व "अवलंबनातून स्वावलंबनाकडे" असे विशेष दिनानिमित्त पालकांसाठी व बालकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आलेल्याची क्षणचित्रे...









# जागतिक समान संधी दिन












समग्र शिक्षण समावेशित शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण आयोजित "जागतिक समान संधी दिन" जिल्हास्तर, तालुकास्तर तसेच केंद्रस्तरावर साजरा करण्यात आला. यामध्ये विशेषतज्ञ, विशेष शिक्षक आणि दिव्यांग विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सन्मान करतानाची क्षणचित्रे...

















# थेट संवाद डॉक्टरांशी








किशोरवयीन दिव्यांग विद्यार्थिनींसाठी मासिक पाळीविषयी
"ती व तीची मासिक पाळी" चर्चासत्र आयोजित करण्यात आल्याची क्षणचित्रे...








# इ. १०वी व इ.१२वी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी "परिक्षा पे चर्चा"

**समावेशित शिक्षण, समग्र शिक्षा, पंचायत समिती कल्याण मार्फत दिव्यांग विद्यार्थी पालक-शिक्षक यांच्यासाठी इ. १०वी व इ. १२ वी बोर्डाच्या परिक्षेला सामोरे जाताना येणारी आव्हाने यासाठी "परिक्षा पे चर्चा" हा उपक्रमाची क्षणचित्रे...**















'हौसलो के पंख से उडा करो, दिव्यांग होकर भी सोचा बडा करो!'

<u>प्रशिक्षण व कार्यशाळा</u>


























समावेशित शिक्षण विभाग, समग्र शिक्षा पंचायत समिती, कल्याण मार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मुख्याध्यापक, अंगणवाडी ताई, शिक्षक, पालक यांना दिव्यांग विद्यार्थ्यांना अध्ययन करताना सोपे जावे म्हणून शिक्षण परिषद अध्ययन-अध्यापन तंत्रपद्धती, पालक प्रशिक्षण, सल्ला समुपदेशन शिबीर, शासन आपल्या दारी यासारखे विविध प्रशिक्षण व कार्यशाळा घेतानाची क्षणचित्रे...



# कलानगरची सफर





समावेशित शिक्षण विभाग
समग्र शिक्षा,
जिल्हा परिषद ठाणे
यांच्या प्राप्त निधीतून
कल्याण गटातून
दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी
कलानगर (फिल्म सिटी)
गोरेगाव येथे शैक्षणिक
सहलीचा आनंद घेतानाची
क्षणचित्रे...



# प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल


















# विशेष दिन सूची

## जानेवारी

०४ जानेवारी - जागतिक ब्रेल दिन

३० जानेवारी - जागतिक कुष्ठरोग निर्मुलन दिन

## फेब्रुवारी

०४ फेब्रुवारी - जागतिक कर्करोग दिवस

२४ फेब्रुवारी - क्षयरोग निवारण दिन

## मार्च

०१ मार्च - बौद्धिक अक्षमता जनजागृती दिन

२१ मार्च - जागतिक डाऊन सिंड्रोम दिन

२४ मार्च- जागतिक क्षय दिन

## एप्रिल

०२ एप्रिल - ऑटिझम दिन

०७ एप्रिल- जागतिक आरोग्य दिन

११ एप्रिल - पार्किंसन्स दिवस

१७ एप्रिल - जागतिक हेमोफेलिया दिन

२५ एप्रिल- मलेरिया दिवस

## मे

०९ मे - जागतिक थॅलेसेमिया दिन

२८ मे - जागतिक मासिक पाळी दिवस

## जून

१० जून - जागतिक दृष्टिदान दिन

२० जून - अध्ययन अक्षमता दिन

२५ जून - जागतिक कोड त्वचारोग दिन

२७ जून - डॉ. हेलन केलर जयंती

## सप्टेंबर

२१ सप्टेंबर - जागतिक अल्झायमर दिन

२६ सप्टेंबर- जागतिक कर्णबधिर दिवस

## ऑक्टोबर

०२ ऑक्टोबर - जागतिक सेरेब्रल पाल्सी दिवस

१० ऑक्टोबर - मानसिक आरोग्य दिवस

१५ ऑक्टोबर - पांढरी काठी दिन

१८ ऑक्टोबर - जागतिक रजोनिवृत्ती दिन

२२ ऑक्टोबर - जागतिक वाचा जागरुकता दिन

२४ ऑक्टोबर - जागतिक पोलिओ दिन

२७ ऑक्टोबर - ऑक्युपेशनल थेरपी दिन

## नोव्हेंबर

०९ नोव्हेंबर - जागतिक कर्करोग जागृती दिन

## डिसेंबर

०१ डिसेंबर - जागतिक एड्स् दिन

०३ डिसेंबर - जागतिक दिव्यांग दिन

# Team Who Dreamed......



**श्री. अशोक भवारी**
गटविकास अधिकारी
पंचायत समिती कल्याण



**डॉ. रुपाली खोमणे**
गटशिक्षणाधिकारी-शिक्षण विभाग
पंचायत समिती कल्याण



**श्रीमती विद्या नाईकवाडी**
गटसमन्वयक-शिक्षण विभाग
पंचायत समिती कल्याण



**श्रीमती वैशाली शिंदे**
विशेषतज्ञ समावेशित शिक्षण विभाग
पंचायत समिती कल्याण



**श्री. किरण लोखंडे**
विशेषतज्ञ समावेशित शिक्षण विभाग
पंचायत समिती कल्याण



**श्री. धिरज ननावरे**
विशेष शिक्षक
समावेशित शिक्षण विभाग
पंचायत समिती कल्याण



**सौ. प्रज्ञा साखरे**
विशेष शिक्षिका
समावेशित शिक्षण विभाग
पंचायत समिती कल्याण



**सौ. सिमा देशमाने**
विशेष शिक्षिका
समावेशित शिक्षण विभाग
पंचायत समिती कल्याण



**श्री. रवी सोनावणे**
विशेष शिक्षक (वाचा तज्ञ)
समावेशित शिक्षण विभाग
पंचायत समिती कल्याण



**श्री. किरण हजारे**
विशेष शिक्षक
समावेशित शिक्षण विभाग
पंचायत समिती कल्याण

# शिक्षण विभाग पंचायत समिती, कल्याण

आज़ादी का अमृत महोत्सव

"सारथी" या पुस्तकेसाठी अचुक माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि शासन निर्णयानुसार योजनांचे निकष, लाभाचे स्वरुप, सेवा सुविधा, साहित्य यामध्ये वेळोवेळी अंशतः बदल होऊ शकतात. त्यामुळे अद्ययावत माहितीकरीता महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई (MPSP) समग्र शिक्षा, समावेशित शिक्षण विभाग जिल्हा परिषद ठाणे, शिक्षण विभाग, पंचायत समिती कल्याण, या संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांशी संपर्क साधावा.

ISBN No. : 978-81-965485-3-7